1) पुढारी पान क्र. 5

दि. 14/02/2023

# मिरा-भाईंदरमध्ये बॉम्बस्फोट करण्याच्या धमकीचा फोन

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई पोलिस सहआयुक्त यांना रविवारी मध्यरात्री २ वाजता मीरा भाईंदरमध्ये बॉम्बस्फोट करण्याच्या धमकीचा फोन आला. त्यांनी लगेच मुंबई नियंत्रण कक्षाला माहिती दिली.

मीरा भाईंदर शहरात बॉम्बस्फोट करणार असल्याचा एका अज्ञात व्यक्तीचा फोन आल्याची माहिती मुंबई पोलीस नियंत्रण कक्षातुन रात्री अडीचच्या सुमारास मीरा भाईदर नियंत्रण कक्षाला देण्यात आली. धमकीचा फोन आल्याने मीरा भाईंदर पोलिस सतर्क झाले असून ठीक ठिकाणी पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे.

मुंबई पोलीस आणि मिरा भाईदर वसई विरार पोलीस यांनी प्रकरणाची गंभीर दखल घेत संयुक्तपणे या प्रकरणाचा तपास करत आहेत. मिरा-भाईंदर शहरातील शॉपिंग मॉल्स, मल्टिप्लेक्स, मार्केट, कार्यालये, धार्मिक स्थळांसह विविध सार्वजनिक ठिकाणी पोलिसांनी गस्त वाढवली आहे. मिरा भाईंदरला सध्या हाय अलर्टवर ठेवण्यात आले आहे. तसेच रस्त्यावर नाकाबंदी केली असून येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची तपासणी केली जात असल्याची माहिती श्रीकांत पाठक अप्पर पोलीस आयुक्त मीरा भाईंदर वसई विरार यांनी दिली आहे. पुढील तपास मुंबई पोलीस करत आहेत व त्यांच्या संपर्कात राहून माहिती मिळताच पुढील कारवाई करण्यात येईल अशी माहिती मीरा भाईंदर वसई विरार परिमंडळ-१ पोलीस उपायुक्त जयंत बजबळे यांनी दिली आहे.



अशाच प्रकारचा रविवारी रात्री मुंबईतील गुगलच्या कार्यालयात फोन आला त्यावेळी त्याने पुण्यातील मुंढवा परिसरातील एका बहुमजली व्यावसायिक इमारतीच्या ११ व्या मजल्यावर असलेल्या कार्यालयात बॉम्ब ठेवण्यात आला आहे' असे सांगितले. माहिती मिळताच पुणे पोलीस आणि दहशतवाद विरोधी पथक घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी शोध घेतला परंतु त्या ठिकाणी कोणताही बॉम्ब नसल्याचे आढळून आले. पोलिसांनी तपास करून या फेक कॉल करणाऱ्या व्यक्तीला हैदराबाद मधून अटक केली आहे.

## फेक कॉलमुळे पोलिसांची तारांबळ

गेल्या वर्षी देखील असाच एक फेक कॉल करून मिरा भाईंदरचे माजी आमदार नरेंद्र मेहता यांचा क्लब बॉम्बने उडवून देण्याची धमकी दिली होती. तेव्हाही अशीच पोलिसांची तारांबळ उडाली होती. त्यावेळी पोलिसांनी तपास केला असता तो एका अतिरेकी संघटनेकडून फोन आल्याचे सांगितले होते. शहरात मोठ्या प्रमाणात पोलीस भरती सुरू आहे. त्यामुळे त्या पोलीस भरतीमध्ये पोलीस कर्मचारी अधिकारी व्यस्त आहेत अशावेळी हा फेक कॉल आल्यामुळे मीरा भाईंदर पोलिसांची तारांबळ उडाली आहे.

2) लोकमत पान क्र. 3

डायल ११२ हेल्पलाइन : नागरिकांना मदतीत पहिल्या दोन स्थानी

# मीरा-भाईंदर, नवी मुंबई पोलिसांचा क्विक रिस्पॉन्स

**सूर्यकांत वाघमारे**
लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** नागरिकांच्या मदतीसाठी सुरू करण्यात आलेल्या ११२ या हेल्पलाइनवर प्राप्त होणाऱ्या तक्रारीला रिस्पॉन्स देण्यात मीरा भाईंदर पोलिस प्रथम क्रमांकावर असून त्यांचा रिस्पॉन्स टाईम साडेपाच मिनिटांहून कमी आहे. नवी मुंबई पोलिस राज्यात दुसऱ्या क्रमांकावर पोहोचले आहेत. काही महिन्यांपूर्वी १४ मिनिटांवर असलेला त्यांचा रिस्पॉन्स टाइम पाच ते सहा मिनिटांवर पोहोचला आहे.

राज्यात सुरू केलेली ११२ हेल्पलाइन येत्या काळात संपूर्ण देशासाठी वापरली जाणार आहे. त्यामुळे ती अधिकाधिक प्रभावी व्हावी व गरजूंना मदत मिळावी यासाठी शासनाचे प्रयत्न आहेत. मागील वर्षभराच्या आढाव्यात नवी मुंबई पोलिसांनी दुसऱ्या क्रमांकावर मजल मारली आहे. १४ मिनिटांवर असलेला रिस्पॉन्स कालावधी कमी करून तो ५ ते ६ मिनिटांवर पोहचला आहे.

## ग्रामीण पोलिसही तत्पर

भौगोलिकदृष्ट्या शहरी भागाचे अंतर कमी असते. त्यामुळे कमीत कमी वेळेत पोलिस एखाद्या ठिकाणी पोहचू शकतात; मात्र ग्रामीण भागातली गावे दूरवर असतात. त्यामुळे तिथपर्यंत पोहोचायला पोलिसांना काहीसा जास्त कालावधी लागतो. त्यानंतरही हा रिस्पॉन्स टाईम कमी कसा करता येईल, यावर अभ्यास सुरू असल्याचेही त्यांनी सरंगल यांनी सांगितले.




▪ पुण्याचा रिस्पॉन्स कालावधी हा साडेबारा मिनिटांचा आहे. ग्रामीण व शहरी भागात रिस्पॉन्स टाईममध्ये अंतर असल्याचे कायदा व सुव्यवस्था अपर पोलिस महासंचालक कुलवंत सरंगल यांनी सांगितले.

**११,११३**
**नवी मुंबईत महिलांशी संबंधित तक्रारी**

वर्षभरात नवी मुंबई पोलिसांनी ११२ वरून प्राप्त झालेल्या ५५ हजार ७९७ तक्रारी हाताळल्या. त्यामध्ये महिलांशी संबंधित ११ हजार ११३ तक्रारी आहेत. यावरून महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हेल्पलाइन उपयुक्त ठरताना दिसत आहे.

CS CamScanner

CS CamScanner

दि. 14/02/2023

३) लोकसत्ता पु. पान क्र. 1

## २०२२ मधील वाहन चोरीच्या ५२५ गुन्ह्यांची उकल नाही

# वसई, विरारमध्ये दररोज सरासरी दोन वाहनांची चोरी


**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई-विरार आणि मीरा-भाईंदर शहरांत दिवसाला सरासरी दोन वाहनांची चोरी होत आहे. २०२२ या वर्षात आयुक्तालयात तब्बल ८४४ वाहन चोरीचे गुन्हे दाखल आहेत. त्यातील ४६१ गुन्ह्यांची उकल झालेली नाही. वाढत्या वाहन चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

शहरातील नागरिकांमध्ये वाहन खरेदी वाढत आहे. दुचाकीबरोबर चारचाकी वाहनांची खरेदी मोठ्या प्रमाणावर होत आहे. सुलभ वाहन कर्ज उपलब्ध असल्यामुळे अनेक कुटुंबे आता चारचाकी वाहने घेऊ लागली आहेत.

एकीकडे वाहनांची संख्या वाढत असताना दुसरीकडे वाहन चोरीचे प्रमाणही वाढू लागले आहे. २०२२ या वर्षात ८४४ वाहन चोरीचे गुन्हे दाखल झाले. त्यापैकी केवळ ३१९ गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. २०२१ मध्येदेखील वाहन चोरीच्या ८६९ घटना घडल्या होत्या. त्यातील ३१९ गुन्ह्यांची उकल झाली होती वाहन चोरीच्या घटना रोखण्यासाठी पोलिसांनी गस्ती वाढविल्या असून शहरात अधिकाधिक संख्येने सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येत आहेत.

वाहन चोरांच्या अनेक टोळ्या पोलीस आणि गुन्हे शाखेने पकडल्या आहेत. मात्र तरीदेखील वाहन चोरीच्या नवनवीन टोळ्या सक्रिय होत असल्याने पोलिसांची डोकेदुखी वाढली आहे. अनेकदा महाविद्यालयीन तरुण मौजमजेसाठी वाहन चोरी करतात आणि नंतर ते निर्जन ठिकाणी सोडून देतात. अनेक नशेबाज वाहनातील सुटे भाग काढून विकण्यासाठी वाहन चोरी करत असतात. त्यामुळे अशा वाहन चोरांना पकडणे पोलिसांना आव्हान ठरले आहे.



### सर्वाधिक चोरी दुचाकींची

वाहन चोरीच्या घटनांमध्ये सर्वाधिक चोरी ही गिअर नसलेल्या दुचाकींची होत असल्याचे पोलिसांनी सांगितले. या दुचाकी बनावट चावीने किंवा तांत्रिक चलाखीने चोरणे सोपे असते. ज्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे नसतील अशा ठिकाणी उभी केलेली वाहने मोठ्या प्रमाणावर चोरली जातात. त्यामुळे पोलिसांनी वाहने उभी करताना निर्जन स्थळी उभी न करणे, शक्यतो सीसीटीव्हीच्या परिसरात ठेवणे, दुचाकींना हॅण्डल लॉक करणे आणि इमारतीच्या बाहेर उभी न करता इमारतीच्या आत वाहने उभी करावीत अशा सूचना दिल्या आहेत.

४) पुढारी पान क्र. 7

# नालासोपाऱ्यात दुषित पाण्यात गवताची शेती

## जनावरांच्या आरोग्याला धोका; भाजपची कारवाईची मागणी

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

नालासोपारा पश्चिमेकडील श्रीप्रस्थ चार रस्ते येथे महापालिकेच्या मालकीच्या जागेत अनधिकृतपणे दुषित पाण्यावर अज्ञाताकडून गवत शेती केली जात असल्याने या दुषित पाण्यात उगवलेल्या गवतामुळे जनावरांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता भाजपा जिल्हा उपाध्यक्ष मनोज पाटील यांनी व्यक्त केली असून संबंधितावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

वसई विरार महापालिका क्षेत्रातील नालासोपारा पश्चिम समेळपाडा, करमाळा, गास, हनुमान नगर परिसरात सांडपाणी वाहून नेणाऱ्या नाल्यात बांध घालून ते दुषित पाणी पंपाद्वारे महापालिकेच्या मालकीच्या तसेच शासकीय जागेत सोडून त्याद्वारे गवत शेती करण्याचा प्रकार सर्रास सुरू आहे.



हे दुषित गवत वसई विरार मधील तबेल्यात दुभत्या जनावरांना पुरवले जाते, दूषित गवत जनावरांच्या आरोग्याला घातक असून याच जनावरांचे दूध वसई विरार मधील जनतेला पुरवले जाते. काही लोक आपल्या वैयक्तिक फायद्यासाठी सर्व नियम धाब्यावर बसवून मनमानी करत असून त्यावर महापालिका प्रशासन डोळेझाक करत असल्याचा आरोप नागरिकांतून होत आहे.

दुसऱ्या बाजूस सांडपाणी जमिनीत सोडल्याने मोठ्या प्रमाणात डास निर्मिती होत असल्याने जनता प्रचंड त्रासलेली आहे. संध्याकाळी ६ नंतर डासांचा त्रास नागरिकांना सहन करावा लागतोय.

दूषित गवतामुळे दुभती जनावरे व लहान मुले व सामन्य नागरिकांच्या आरोग्याशी खेळण्याचा प्रकार तातडीने थांबवा यासाठी तातडीने कारवाई करून संबंधितांवर जनतेच्या आरोग्याशी खेळणे तसेच नाल्यावर अतिक्रमण करणे व शासकीय जागेचा गैरवापर करण्याबद्दल गुन्हे दाखल करून नाले मोकळे करून गवत नष्ट करावे अशी मागणी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष मनोज पाटील यांनी लेखी निवेदनाद्वारे महापालिका अतिरिक्त आयुक्त व शहर अभियंता यांच्याकडे केली आहे. यावर तातडीने कारवाई करण्याचे आश्वासन दोन्ही अधिकाऱ्यांनी दिले अशी माहिती मनोज पाटील यांनी दिली.

CamScanner

दि. 14/02/2023

5) लोकसत्ता पु. पान क्र. 1

# प्रेयसीला 'व्हॅलेन्टाइन डे'ची भेट देण्यासाठी महागड्या वाहनांची चोरी

## आरोपीला अटक

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई:** व्हॅलेन्टाईन डे ला प्रेयसीला भेट देण्यासाठी एका २३वर्षीय तरुणाने महागड्या वाहनांची चोरी केली आहे. या आरोपीला व्हॅलेन्टाईन डेच्या पूर्व संध्येलाच माणिकपूर पोलिसांनी अटक केली आहे. अटक आरोपीकडून ५ दुचाकी हस्तगत केल्या आहेत.

वसई, विरार शहरात वाहनचोरीच्या घटना समोर येत आहेत. नुकताच नायगाव पश्चिम परिसरात दुचाकी चोरी झाल्याची घटना घडली होती. याप्रकरणी माणिकपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. सातत्याने अशा घटना समोर येत असल्याने वरिष्ठांनी दिलेल्या सुचनेनुसार माणिकपूर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने तपास सुरू केला होता.

बातमीदाराने दिलेल्या माहितीवरून माणिकपूर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे. सदर आरोपीचे नाव चंद्रेश पाठक (२३) असून त्याच्याकडून तीन लाख ९० हजार रुपये किमतीच्या पाच दुचाकी हस्तगत केल्या आहेत. अटक केलेल्या आरोपीची चौकशी केली असता व्हॅलेन्टाईन डेच्या दिवशी प्रेयसीला भेट देण्याच्या उद्देशाने वाहन चोरी करीत असल्याची कबुली दिली आहे. १४ फेब्रुवारीला प्रेयसीसोबत व्हॅलेन्टाईन डे साजरा करण्याच्या पूर्वसंध्येलाच पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे, अशी माहिती माणिकपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपतराव पाटील यांनी दिली.

कामगिरी परिमंडळ-३ पोलीस उपायुक्त सुहास बावचे, साहाय्यक पोलीस आयुक्त पद्मजा बडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने केली आहे.

6) सकाळ पान क्र. 1

# वसईत पोलिसाला बोनेटवरून दीड किलोमीटर फरपटत नेले

## तरुण अटकेत; १६ फेब्रुवारीपर्यंत कोठडी

नालासोपारा, ता. १३ (बातमीदार) : सिग्नल तोडून भरधाव वेगात पळणाऱ्या कारचालकाला अडवण्यासाठी गेलेल्या वाहतूक पोलिसाला कारच्या बोनेट वरच दीड किलोमीटर फरपटत नेत त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना वसईच्या एव्हरशाईन परिसरात रविवारी (ता. १२) रात्री घटना घडली. या घटनेत वाहतूक पोलिस बचावला असून, किरकोळ जखमी झाला आहे. याबाबत आरोपीविरोधात माणिकपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली. आज (ता. १३) त्याला वसई न्यायालयात हजर केले असता १६ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आली.

सोमनाथ चौधरी हा वाहतूक पोलिस हवालदार वसंत नगरी सिग्नलवर रविवारी रात्री कर्तव्य बजावत होता. रात्री पावणेआठच्या सुमारास कारचालक (यूपी ३२ डीजे ७७०७) सावेश सिद्दीकी (२१) हा वाहन चालवण्याचे परवाना नसताना सिग्नल तोडून, भरधाव वेगात कार चालवत होता. यावेळी हवालदार चौधरी याने हात दाखवून कार थांबवण्याचा प्रयत्न केला, पण त्यांच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केले. वाहतूक पोलिस कारसमोर आले असता त्यांना कारच्या बोनेटवर घेऊन वसंत नगरी सर्कल ते रेंज नाक्यापर्यंत फरफटत नेले. या वेळी काही जागरूक वाहनधारकांनी कारच्या समोर वाहन लावून कार थांबवून कारचालकाला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याच्यावर गुन्हा दाखल करून त्याला अटक केल्याची माहिती माणिकपूर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संपतराव पाटील यांनी दिली.

7) पुढारी पान क्र. 7

# मनपा परिवहन कर्मचाऱ्यांना दुकानदारांकडून मारहाण; गुन्हा दाखल

**मिरारोड :** मिरारोड रेल्वे स्थानक परिसरात असलेल्या चौकात उभी केलेली चारचाकी गाडी बाजुला घेण्यास सांगितल्याने दुकानमालक व त्याच्या कर्मचाऱ्याने मिरा भाईंदर महापालिका परिवहन विभागातील कर्मचाऱ्यांना मारहाण व शिवीगाळ केली आहे. नयानगर पोलीस ठाण्यात शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून नयानगर पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. मिरारोड पूर्वेला रेल्वेस्थानकाजवळ असलेल्या चौकात मिरा-भाईंदर परिवहन, बेस्ट, ठाणे परिवहन सेवेचे बसस्थानक आहे. या चौकात बस वळवून तेथील बसस्थानकावरून प्रवासी वाहतूक केली जाते. याच चौकात टॉप १० मोबाइल नावाचे दुकान आहे. त्याचे मालक अनिल छेडा याने चारचाकी गाडी शनिवारी चौकात उभी केली होती. परिवहन विभागाचे बसचालक हनुमंत उगलमोगले हे दुपारी मीरारोड स्थानकाजवळ बस घेऊन आले होते. त्यावेळी त्या चौकात उभ्या केलेल्या वाहनामुळे बस वळवून घेण्यास अडथळा येत होता. त्यामुळे बसचालकाने छेडा याची गाडी पुढे घेण्यास सांगितले. छेडा यांनी गाडी पुढे घेण्यास नकार देऊन महापालिका परिवहन बसचालकास शिविगाळ केली. ते पाहून बस वाहक, तिकीट तपासनीस आदी कर्मचारी तेथे आले असता त्यांना छेडा व त्याच्या कर्मचाऱ्याने शिवीगाळ, मारहाण व दमदाटी केली. त्यावेळी परिवहन विभागाचे वाहक घनश्याम पाटील यांच्या हातातील १० हजार रोख रकम कोठेतरी पडून गहाळ झाली व तिकीट मशीनचे तुटून नुकसान झाले. दुकान मालक अनिल छेडा व त्यांचे कर्मचारी कमलेश मिश्रा यांच्यावर मारहाण व शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी भारतीय दंडसंहिता १८६० कलम ३५३, ३३२, ४२७, ५०४, ३४ अंतर्गत नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून दुकानदार व त्याच्या कर्मचाऱ्याला अटक करण्यात आली आहे.

CS CamScanner

CS CamScanner

8) म.टा.पु. पान क्र. 1

दि. 14/02/2023

# दत्तक मूल देण्यासाठी खंडणी; दोघे अटकेत

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

**भाईंदरमधील कारवाई**



दत्तक देण्याची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करता एका जोडप्याला मुलगी दत्तक देऊन, नंतर धमकावून खंडणी वसूल करणाऱ्या दोघांना भाईंदरमध्ये अटक करण्यात आली आहे. नवघर पोलिसांच्या गुन्हे शाखेने ही कारवाई केली. ही मुलगी अटक केलेल्या आरोपींच्या परिचयातील एका महिलेची असल्याचेही तपासात समोर आले.

मिरा रोडमध्ये राहणाऱ्या विवाहित जोडप्याला दोन मुले असली, तरी मुलीची आवड असल्याने मुलगी दत्तक घ्यायची असल्याचे त्यांनी मित्रांना कळवले होते. त्यावरून कल्पेश कच्छिया नामक व्यक्तीने या जोडप्याशी संपर्क साधला. मुलीची आई पळून गेली असून आर्थिक परिस्थिती नसल्याने तिला दत्तक द्यायचे असल्याचे त्याने सांगितले. या मुलीला या जोडप्याच्या ताब्यात दिल्यावर, तिची आई परतल्यानंतर कायदेशीर प्रक्रिया करू असे सांगण्यात आले. मुलीच्या जन्मावेळी झालेला २० हजार रुपयांचा खर्चही कल्पेशने या जोडप्याकडून घेतला.

काही दिवस उलटल्यानंतर या जोडप्याने दत्तकत्वाची कायदेशीर प्रक्रिया करण्यासाठी कल्पेशकडे तागदा लावला. त्यावर कल्पेश पुन्हा मुलीला घेऊन गेला. त्यानंतर यश सोनी नामक व्यक्तीने कल्पेशची पत्नी ही मुलगी परत देण्यासाठी व कायदेशीर प्रक्रिया करण्यासाठी अडीच लाख रुपये मागत असल्याचे जोडप्याला सांगितले. ही रक्कम दिल्यानंतर, मुलीला त्या जोडप्याकडे देण्यात आले. मात्र कायदेशीर प्रक्रिया करण्याच्या नावाखाली या जोडप्याकडे वारंवार पैशांसाठी तगादा लावण्यात आला.

यामुळे मुलगी दत्तक देणाऱ्या कल्पेशवर या जोडप्याला संशय आल्याने त्यांनी नवघर पोलिस ठाण्यात तक्रार केली होती. त्यावरून नवघर पोलिसांनी कल्पेश व हितेश सोनी या दोघांविरोधात विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला. गुन्हे शाखेने या दोघांना अटक केली आहे. पोलिसांनी मुलीच्या आईची प्राथमिक चौकशी केली असता, दोघेही आरोपी तिच्या ओळखीचे असल्याचे समोर आले.

9) पुण्यनगरी पु. पान क्र. 1

# जुगार खेळणाऱ्या ९ जणांवर कारवाई

**मीरा रोड :** नयानगर पोलीस ठाणे हद्दीतील शांतीनगर येथील जैन मंदिराजवळ असलेल्या एका इमारतीत जुगार खेळणाऱ्या ८ जणांवर व जुगार खेळवणारा एक अशा ९ जणांवर पोलिसांनी कारवाई केली आहे. मीरा रोड येथील सेक्टर नंबर ४, शांतीनगर येथील जैन मंदिराजवळ असलेल्या इमारतीत एका फ्लॅटमध्ये जुगार खेळत असल्याची माहिती गुन्हे शाखा कक्ष १ यांना मिळाली. त्यानुसार त्या इमारतीमधील फ्लॅटमध्ये गुन्हे शाखेने पोलीस पथकासह छापा टाकला. त्यावेळी फ्लॅटच्या हॉलमध्ये एक महिला बसली होती. तिच्याकडे चौकशी केली असता तिने बेडरूममध्ये जुगार खेळत असल्याचे सांगितले. त्या बेडरूमचा दरवाजा उघडला असता तेथे ६ महिला व २ पुरुष पत्ते खेळत असल्याचे दिसून आले. त्यावेळी चौकशी केली असता ते ३ पत्त्याचा जुगार खेळत असल्याचे सांगितले. तसेच समोर असलेली महिला ही जुगार खेळण्यासाठी प्रत्येक डावा मागे पैसे घेते असे सांगितले.

10) लोकमत पान क्र. 3

# पत्नीचा मृतदेह बेडमध्ये लपविला

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**नालासोपारा :** तुळींजच्या जीवदानीनगरमधील सीता सदन येथील मेघा शहा (४०) यांची त्यांचे पती हार्दिक शहा यांनी हत्या केल्याचे उघड झाले आहे. तीन ते चार दिवसांपूर्वी त्यांची हत्या करून मृतदेह बेडमध्ये लपवून ठेवण्यात आला होता.

तुळींज पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला आहे. पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून फरार आरोपी पतीचा शोध सुरू केला आहे. सोमवारी सायंकाळी तुळींज पोलिसांना सीता सदन येथे उग्र वास येत असल्याची माहिती मिळाली होती. पत्नीची हत्या केल्यानंतर हार्दिक शहाने मावशीला व्हॉट्सॲपवर मेसेज पाठविल्याचेही समजते.

CS CamScanner

CS CamScanner

११) पुढारी पृ. पान क्र. 4

दि. 14/02/2023

# वसई -विरार महापालिकेचे सुशोभीकरण वादात?

## आयुक्तांवर ॲट्रोसिटीअंतर्गत गुन्हा दाखल करा - महेश सरवणकर

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

वसई-विरार महापालिका क्षेत्रात करदात्या नागरिकांच्या करातून जमा झालेल्या पैशातून ठिकठिकाणी चौक सुशोभिकरणाचे काम सुरू आहे. शहरातील ठिकठिकाणचे चौक नव्याने सुशोभिकरणाचा घाट आयुक्त अनिलकुमार पवार यांनी घातला आहे. त्यासाठी महापालिकेमार्फत करोडो रुपयांचा खर्च केला जात आहे. चौक सुशोभिकरण करताना त्यावर बसविलेल्या पुतळ्याच्या देखाव्यातून आदिवासी संस्कृतीची अवहेलना करणारा देखावा उभा करण्यात आला असल्याचा आरोप करण्यात येत असून आदिवासी संस्कृतीची अवहेलना करणाऱ्या वसई-विरार महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांच्यावर ॲट्रोसिटीअंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी भारतीय जनता पार्टी वसई रोड शहर उपाध्यक्ष महेश सरवणकर यांनी आदिवासी विकास मंत्री विजयकुमार कुमार गावीत यांच्याकडे केली आहे. मात्र पालिकेचे कार्यकारी अभियंता राजेंद्र लाड यांनी पुतळ्या मध्ये त्रुटी असल्यास दुरुस्ती करून घेतले जाईल असे सांगितले आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'एच' कार्यक्षेत्रात येत असलेल्या बाभोळा येथील बाभोळा पोलीस चौकीसमोरील चौक तोडून नव्याने बांधकाम करून त्यावर आदिवासी बांधव तारपा नृत्य करीत असल्याचा देखावा तयार करण्यात आला आहे. सदर आदिवासी तारपा नृत्य करीत असल्याच्या देखाव्यातील पुतळे बसविताना आदिवासी बांधवांच्या संस्कृतीची अवहेलना करण्याचा प्रकार वसई-विरार महापालिकेकडून करण्यात आला आहे. आदिवासी संस्कृतीमध्ये तारपा नृत्याला विशेष महत्त्व आहे; परंतु पालिकेमार्फत जो तारपा नृत्याचा पुतळा बसविण्यात आला आहे, त्या पुतळ्यामध्ये साकारलेले चित्र आणि प्रत्यक्ष तारपा नृत्य यात प्रचंड तफावत आहे. प्रत्यक्ष तारपा नृत्यामध्ये ज्या ठिकाणी प्रत्यक्ष हात ठेवला जात नाही त्या ठिकाणी हात ठेवल्याचे चित्र पुतळ्यांमध्ये रेखाटण्यात आले आहे. अशा सदोष पुतळ्यांमुळे आदिवासी संस्कृतीची अवहेलना होत असल्याचे नमूद केले आहे.

१२) पुढारी पृ. पान क्र. 4

# आदित्य ठाकरेंच्या स्वागताची उत्तर वसईत निष्ठावंतांची जंगी तयारी

**नालासोपारा :** नरवीर चिमाजी अप्पांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ऐतिहासिक भूमीत शिवसेना नेते माजी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे हे वसईत येत असल्याने वसई शहर प्रमुख प्रथमेश राउत आणि त्यांच्या सहकारी शिवसैनिकांनी कंबर कसली असून गेले दोन दिवसापासून आदित्य ठाकरे येणाऱ्या मार्गावर मोठमोठ्या कमानी पोस्टर्स लावण्यात आले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या फुटी नंतर पहिल्यांदाच माजी मंत्री आदित्य ठाकरे वसईत येत असल्याने निष्ठावंत शिवसैनिकांत उत्साह आहे. वसईचे शहर प्रमुख प्रथमेश राउत यांनी सांगितले कि शिवसेना नेते युवा सेना प्रमुख,माजी पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे १४-२-२३ ला वसईत येणार दुपारी २ वाजता बांद्रा एसी लोकलने वसईच्या स्टेशनवर ३ वाजता उतरल्यावर तेथे शहराच्या वतीने भव्य स्वागत केले जाणार आहे. तेथून भव्य बाईक रॅली भुईगाव सहयोग लोककला मंच च्या सभागृहाचे उद्घाटन दुपारी ३.३० वाजता जुचंद्र क्रिकेट स्पर्धा ४.३० वाजता ,नायगाव पूर्व परेरा नगर कौटुंबिक मेळावा ५.३० वाजता होणार आहे. या मेळाव्याला जिल्हाप्रमुख पंकज देशमुख,माजी विरोधी पक्षनेते विनायक निकम,माजी नगरसेविका किरण चेंदवणकर, विवेक पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी-कार्यकर्ते उपस्थित राहणार असून यावेळी सर्व निष्ठावंत पदाधिकारी, शिवसैनिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन प्रथमेश राउत यांनी केले आहे.

CamScanner

CMYK
MHT
राष्ट्रीय हिन्दी दैनिक
मुंबई हिंदमाता टाइम्स
मुंबई, मंगलवार 14 फरवरी 2023
RNI No. MAHHIN/2006/20347
आज का पचांग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सर्राफा बाजार
संवत् 2079, | 07.08 am | 06.38 pm | अधिकतम 34°C | न्यूनतम 22°C | NSE BSE

# विरार से 1 बांग्लादेशी गिरफ्तार



**विरार।** विरार पुलिस ने नालासोपारा के मोरेगांव इलाके में पिछले 12 साल से रह रहे एक बांग्लादेशी को गिरफ्तार किया है, जो बीना किसी कागजात के अवैध रुप से यहां रह रहा था। फिलहाल बांग्लादेशी को पुलिस ने विभिन्न धाराओं के तहत मामला दर्ज कर जांच कर रही है।

## पुलिस को मिली थी गुप्त सूचना

सीनियर पीआई राजेंद्र कांबले ने बताया कि शनिवार दोपहर उन्हें गुप्त सूचना मिली कि मनवेल पाडा स्थित लकी बार के पास एक बांग्लादेशी आने वाला है। सूचना के बाद वहां पुलिस टीम तैनात की गई। इस बीच पुलिस ने सोहिल हारून मोडल (32) को हिरासत में लेकर जांच पड़ताल की तो उसने बांगलादेश के जेसोर राज्य का रहने वाला बताया है। उसके पास भारत मे रहने के लिए कोई भी प्रमाण पत्र नहीं थे। इसी तरह पिछले महीने चंदनसार क्षेत्र के बरफ पाड़ा से एक बांग्लादेशी अलाउद्दीन लालचंद मंडल (42) को गिरफ्तार किया गया था। वह भी बारह साल से नालासोपारा में रह रहा था।

CamScanner

NBT नवभारत टाइम्स

# एक्सटॉर्शन के मामले में मां सहित तीन आरोपी गिरफ्तार

## नवजात को दत्तक देकर आरोपी करते थे अवैध वसूली

**अमित तिवारी, मीरा-भाईंदरः** मीरा-भाईंदर के नवघर रोड पुलिस ने नवजात बच्ची को दत्तक देकर लोगों से अवैध वसूली करने के आरोप में मां सहित तीन लोगों को गिरफ्तार किया है। आरोपित महिला अपनी ही बच्ची को दत्तक देकर लोगों को ठगती थी।

शिकायतकर्ता मनीष यादव (42) अपनी पत्नी और 2 बच्चों के साथ मीरा-भाईंदर में रहते हैं। मनीष को कोई बेटी नहीं थी। वह एक बेटी दत्तक लेना चाहते थे। एक मित्र चिराग मेहता के माध्यम से आरोपी अल्पेश कच्छीया से मुलाकात हुई थी। अल्पेश ने मनीष को बताया कि उसकी पत्नी एक बच्ची को जन्म देकर भाग गई है। वह अपनी बच्ची को दत्तक देना चाहता है। कागजी प्रक्रिया के पूरा होने से पहले ही मनीष ने उस बच्ची को अपने साथ ले आया।



शिकायतकर्ता मनीष ने बताया कि कुछ दिनों बाद उसके पास एक युवक ने कागजी कार्रवाई पूरी करने के लिए ढाई लाख रुपये मांगे थे। उसने उसे ढाई लाख रुपये दे दिए, लेकिन इसके बाद भी लगातार उससे पैसे की मांग जारी रही। आरोपी उस बच्ची को भी जबरन वापस ले गए। इन लोगों ने मनीष के खिलाफ पुलिस में शिकायत करने की धमकी भी दी। इसके बाद मनीष ने आरोपियों की शिकायत दर्ज कराई। पुलिस ने मां सहित तीन आरोपियों को गिरफ्तार कर लिया है।

CamScanner

पुढारी

# गुटखा वाहतूक करणाऱ्यावर कारवाई

मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा

काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीत दुचाकीवरून गुटखा घेऊन जाणाऱ्या इसमावर काशिमिरा पोलिसांनी कारवाई करून अटक केली आहे. गुटखा वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली दुचाकी व गुटखा असा ७९२६८ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे.

काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करत असताना मानवी आरोग्यास अपायकारक असलेला व महाराष्ट्र शासनाने वाहतुकीस व विक्रीस प्रतिबंधीत केलेला तंबाखुजन्य पदार्थ घेवुन एक अनोळखी इसम हॉटेल एक-सप्रेस इनच्या बाजुने जाणार आहे अशी माहिती मिळाली. माहिती मिळताच त्या ठिकाणी सापळा रचला. त्यावेळी घोडबंदर रस्त्यावरून एक दुचाकी येताना दिसली असता ती दुचाकी थांबवली. त्याचे नाव विचारले असता सोमाराम नेथीजी माली असे सांगितले. त्या दुचाकीचा तपासणी केली असता गाडीमध्ये सफेद रंगाच्या दोन गोण्या ठेवलेल्या आढळुन आल्या. त्याच्याविरुद्ध भादंवि कलम ३२८, २७२, २७३, ३४ अन्वये गुन्हा दाखल आहे.

CamScanner

पुण्य नगरी

# मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कमी वेळेतील संकटमोचक

## राज्यातील पोलिसांत एक नंबर!

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकडून नागरिकांना लवकरात लवकर मदत मिळावी यासाठी डायल ११२ सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे हे पोलीस आयुक्तालय मोबाईलवरून ११२ नंबरवर संपर्क केल्यानंतर सर्वात कमी वेळेत नागरिकांना मदत करणारे राज्यातील पहिले पोलीस आयुक्तालय ठरले आहे. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात २०२२ या वर्षी नागरिकांना संकटसमयी तत्काळ पोलिसांची मदत मिळावी, यासाठी ११२ हा नंबर सुरू करण्यात आला. २०२२ मध्ये ११२ वर मदतीसाठी ३४ हजार ९८७ फोन आले. फोन आल्यानंतर ७ मिनिटे ३४ सेकंदात फोन केलेल्या व्यक्तीला मदत देण्यात आली आहे, तर जानेवारी २०२३ या महिन्यात ३,९१८ फोन आले असून त्या व्यक्तीला ३ मिनिटे ४९ सेकंदात मदत करण्यात आली आहे. पोलिसांनी ११२ वर आलेल्या सर्व म्हणजे १०० टक्के फोनला प्रतिसाद दिल्याची माहिती आयुक्तलयाकडून देण्यात आली आहे. यामुळेच मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय हे नागरिकांना कमी वेळेत मदत करणारे पहिले आयुक्तालय ठरले आहे. डायल ११२ हा अडचणीत असलेल्या व्यक्तीला तत्काळ मदत मिळावी यासाठी क्रमांक दिला आहे. या क्रमांकावर भांडणे, मारामारी, ध्वनी प्रदूषण याबाबत सर्वात जास्त तक्रारी येतात. अनेक वेळा रस्त्याने जाणाऱ्या मुलींची काहीजण छेड काढत असल्याच्या तक्रारी देखील डायल ११२ वर आल्या आहेत. त्यांनाही तत्काळ मदत करण्यात आली आहे. यामुळे रस्त्यावरून जाताना महिलांना कोणतेही संकट आले किंवा संकटाची जाणीव झाली तर त्यांनी डायल ११२ वर फोन करून मदत मागावी. फोन करताच काही मिनिटांत पोलीस मदतीसाठी हजर होतात. पोलीस आयुक्तालयाला मदतीसाठी आपत्कालीन वाहन मिळाले आहे. नागरिकांना मदत करण्यासाठी लागणारी वेळ आणखी कमी करण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना करण्यात येत असल्याचे पोलीस आयुक्तालयाकडून सांगण्यात आले आहे.



CamScanner

पुढारी

# ६ जुगारी महिलांसह ८ जणांवर कारवाई

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

नयानगर पोलीस ठाणे हद्दीतील शांतीनगर येथील जैन मंदिराजवळ असलेल्या एका इमारतीत जुगार खेळणाऱ्या ८ जणांवर पोलिसांनी कारवाई केली आहे.

मिरारोड येथील सेक्टर नंबर ४, शांतीनगर येथील जैन मंदिराजवळ असलेल्या इमारतीत एका फ्लॅट मध्ये जुगार खेळत असल्याची माहिती गुन्हे शाखा कक्ष १ यांना मिळाली. त्यानुसार त्या इमारतीमधील फ्लॅटमध्ये गुन्हे शाखेने पोलीस पथकासह छापा टाकला. त्यावेळी फ्लॅटच्या हॉलमध्ये एक महिला बसली होती. तिच्याकडे चौकशी केली असता तिने बेडरूममध्ये जुगार खेळत असल्याचे सांगितले. त्या बेडरुमचा दरवाजा उघडला असता तेथे ६ महिला व २ पुरुष पत्ते खेळत असल्याचे दिसून आले. त्यावेळी चौकशी केली असता ते ३ पत्त्याचा जुगार खेळत असल्याचे सांगितले. तसेच समोर असलेली महिला ही जुगार खेळण्यासाठी प्रत्येक डावा मागे पैसे घेते, असे सांगितले. त्या महिला व पुरुष हे वेगवेगळ्या ठिकाणावरून जुगार खेळण्यासाठी तेथे आले होते. त्यांच्याकडे १९४१० रुपये रोख रकम मिळून आली.

Thane Edition
Feb 13, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

CamScanner

पुढारी

# मोटारसायकल चोरणाऱ्यास अटक

## ३ लाख ९० हजारांचा मुद्देमाल जप्त

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

माणिकपूर पोलीस ठाणे हद्दीत एका मोटारसायकल चोरी करणाऱ्या आरोपीला माणिकपूर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक केली असून त्याच्याकडून लाख ९० हजारांच्या ५ मोटारसायकल जप्त करण्यात आल्या आहेत.

माणिकपूर पोलीस ठाणे हद्दीमध्ये निहाल संजय घरत यांनी त्यांची मोटारसायकल नायगाव पश्चिम ब्रिजच्या बाजूला उभी केली होती. ती मोटार सायकल अज्ञात इसमाने चोरी केल्याबाबत माणिकपुर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. माणिकपुर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि सचिन सानप व पोलीस अंमलदार यांनी दाखल गुन्ह्याचा तपास करून आरोपी चंद्रेश गणेशप्रसाद पाठक, वय २३ वर्षे यास सापळा रचून ताब्यात घेण्यात आले.

त्याच्याकडे विचारपुस केली असता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केल्याने त्याला गुन्हात अटक केली आहे.

अटक केल्यानंतर त्याच्याकडे चौकशी केली असता माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीत व इतर ठिकाणी मोटर सायकल चोरल्याचे सांगितले. त्याच्याकडून ३ लाख ९० हजार रुपयांच्या ५ मोटर सायकली जप्त करण्यात आल्या आहेत. माणिकपूर पोलीस ठाणे हद्दीत त्याने केलेले २ गुन्हे उघड करण्यात आले आहेत व ३ गुन्ह्यांचा तपास चालू आहे.

Thane Edition
Feb 12, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

CS CamScanner